बीड । रविवार
२९.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २६२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 Mob : 9822152955 

# संतोष देशमुख हत्यांकाड ;
# बीडमध्ये सर्वपक्षीयांचा मोर्चा

**बीड, (प्रतिनिधी):–बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी आज बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चानंतर आयोजित करण्यात आलेल्या सभेत सर्वच पक्षांच्या नेत्यांनी एका सुरात या प्रकरणी वाल्मीक कराड याला अटक करण्याची व मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली.**

## वाल्मीक कराडला अटक अन् धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची एका सुरात मागणी

## 'वाल्यांना' थांबवण्याची वेळ आली–आव्हाड

आता बीडमधील 'वाल्यांना' थांबवण्याची वेळ आली आहे. नाही तर महाराष्ट्रात सर्वत्र असे लोक तयार होतील. आज व्यक्त होणारी जनता बीडमध्ये रस्त्यावर उतरली आहे. अशी जनता महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरली, तर या शासनाला पळता भुई थोडी होईल. त्यामुळे वेळीच सावध व्हा, असेही आव्हाड यावेळी बोलताना म्हणाले. बीडमध्ये अनेक वंजारी जातीच्या लोकांच्याही हत्या झाल्या. या लोकांनी कुणालाही सोडले नाही. यांचे अनेक अवैध धंदे सुरू आहेत. पण कुणीही आतापर्यंत समोर आले नाही. या प्रकरणातील आका कोण आहे हे सर्वश्रूत आहे. पण कुणीही त्याचे नाव घेत नाही. आता आका – बिका काही नाही. या आकाचा बाप शोधा. त्या बापाला अगोदर मंत्रिमंडळातून बाहेर काढा, असे ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या मोर्चातील सभेतून थेट धनंजय मुंडे यांच्यावर हल्ला चढवला. बीडचे पालकमंत्री व पोलिसांनी मिळून जिल्ह्याचा सत्यानाश केला, असे ते म्हणाले. बीडच्या राजकारणाला पूर्वी जातीचा स्पर्श नव्हता. पण आता चित्र बदलले आहे. ▶▶पान २ वर



## शस्त्र परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा–आ.सुरेश धस



भाजप आमदार सुरेश धस यांनी यावेळी बीड जिल्ह्यातील वारेमाप वाटप करण्यात आलेल्या शस्त्र परवान्यांवरून पोलिस प्रशासनावर टीका केली. ते म्हणाले, या बीड जिल्ह्यात 'गोली मार किधर भी' सुरू झाले आहे. जिल्ह्यात १२०० ते १३०० शस्त्र परवाने वाटप करण्यात आले. हे परवाने ज्या ज्या जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांनी वाटले त्या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. गोपीनाथ मुंडे यांनी आपल्या काळात मटक्याचा खटका बंद केला. मुंबईतील गँगवॉर बंद केले. त्यांच्यासोबत आम्ही काम केले. पण आता पंकजा मुंडे यांना चांगली माणसे चालत नाहीत. ▶▶पान २ वर

## सरकारला गुंड पोसायचे आहेत–मनोज जरांगे

संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्यांना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जनतेची आहे. जनतेची जी मागणी आहे तीच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची हवी, असे मनोज जरांगे म्हणाले. तुम्ही त्यांच्यासोबत चहा प्यायला लागले तर गुंडगिरी कशी कमी होणार? असा सवालही मनोज जरांगे यांनी केला. तुम्ही गुंडगिरीला बळ द्यायला लागले आहेत. तुम्ही आल्यापासून हे पूर्ण दबायला पाहिजेत, हे तर जास्तच सक्रीय झाले, असा घणाघात मनोज जरांगे यांनी यावेळी केला. सरकारला गुंडच पोसायचे असून हे राज्य वेगळ्या दिशेने न्यायचे असल्याचा आरोपही मनोज जरांगे यांनी यावेळी केला.






## 'बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना केले तर'
### संभाजीराजे छत्रपती यांची मोठी घोषणा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपीला शिक्षा करण्याच्या मागणीसाठी बीडमध्ये शनिवारी सर्वपक्षीय मूक मोर्चा निघाला. या मोर्चात संभाजी राजे छत्रपती यांनी सहभाग घेतला. त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला केला. ते म्हणाले, धनंजय मुंडे यांना मंत्रिपद देऊ नका, असे मी म्हटले होते. आता त्यांचा राजीनामा घेतील की नाही, हकालपट्टी करतील की नाही हे मला माहीत नाही. परंतु धनंजय मुंडे यांना पालकमंत्रीपद देऊ नका. त्यांना बीडचे पालकमंत्री पद दिले तर बीडचे पालकत्व मी घेणार आहे, अशी घोषणा संभाजी राजे छत्रपती यांनी केला. संभाजीराजे छत्रपती म्हणाले, संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यावेळी मी महाराष्ट्रात नव्हतो. संतोष देशमुख यांना क्रूर पद्धतीने मारले गेले. संतोष देशमुख यांना ज्या क्रूरपणे मारले गेले, ते दुर्दैव आहे. शिवाजी महाराजांच्या घरात जन्म होऊनही मला ते पाहावले नाही. शाहू, फुले ▶▶पान २ वर






## धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही–खा.सोनवणे

बीड जिल्ह्यात आज कायदा सुव्यवस्था नावाला राहिली नाही. संतोष देशमुख हे हेवा वाटणारे माणूस होता. त्यांना संपवण्याचे काम या परळीच्या लोकांनी केले. या सर्वांचे मूळ विंड मिलच्या खंडणीच्या प्रकरणात लपले आहे. आज २० दिवस झाले, पण संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांचा शोध लागला नाही. या प्रकरणी केवळ आश्वासन दिले जात आहे. चौथा आरोपी अटक झाला की सरेंडर झाला हे अजून समजले नाही. वाल्मीक कराड या प्रकरणातील आका आहे. तर त्याचा सूत्रधार हे धनंजय मुंडे आहेत. त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही, असे बजरंग सोनवणे म्हणाले. संतोष देशमुख यांना अत्यंत निर्घृणपणे मारहाण करण्यात आली. त्यामुळे त्यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली.



## धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या–सोळंके

धनजंय मुंडे यांनी पालकमंत्रीपदाचे अधिकार मिळाल्यानंतर पोलिस प्रशासनावर वचक निर्माण केला. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने हजारो निष्पाप लोकांवर गुन्हे दाखल केले. हे लोक गोदावरी नदीतून शेकडो ट्रक वाळूचा अवैध उपसा करतात. त्यामुळे या वाल्मीक कराडच्या मागे असणारे धनंजय मुंडे मंत्रिपदावर असेपर्यंत या प्रकरणाचा योग्य तपास होणार नाही. कुणीही न्यायाची अपेक्षा ▶▶पान २ वर



## वाल्मिक कराडला अटक करा–क्षीरसागर

वाल्मिक कराडला अटक करण्याची मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. संतोष देशमुख हे बौद्ध समाजाच्या मुलासाठी पुढे आले होते. या मोर्चात कोणतेच राजकारण नसल्याचे संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. वाल्मिक कराडच्या गुंडांकडूनच देशमुख यांची हत्या झाली. त्यामुळे या प्रकरणाचा तपास पूर्ण होऊन शिक्षा होईपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची मागणी क्षीरसागर यांनी केली.



## मुंडेंना मंत्रिमंडळात स्थान द्यायला नको होते–नरेंद्र पाटील

धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळात स्थान द्यायला नको होते. अजित पवार यांनी देशमुख कुटुंबींयांची भेट घेतली होती. आता देशमुख यांना न्याय देण्याची मागणी नरेंद्र पाटील यांनी केली. जो पर्यंत या प्रकरणातील आका समोर येत नाही, तो पर्यंत शांत बसणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची मागणी या वेळी विविध उपस्थित नेत्यांनी केली.



## सर्वांनी एक होत बाबांना न्याय मिळवून द्या–वैभवी देशमुख

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी आज बीडमध्ये सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात येतर आहे. या मोर्चात अनेक नेते उपस्थित झालेत. यात संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचाही समावेश आहे. आरोपीला फाशीची शिक्षाच झाली पाहिजे. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे, असे देशमुख यांचे बंधू धनंजय ▶▶पान २ वर



# बबड्या रुपया, कारटा डॉलर



वर्तमानाचा विचार करताना देशाची संपत्ती, साधनसामग्री, उपभोग आणि व्यवहार यांची सुसंगत मांडणी अपरिहार्यच. त्यातून उरणारा प्रश्न एवढाच की, आपल्या घरची अर्थव्यवस्था ही चिंताकारक बनली आहे, हे पटते आहे काय? अगदी विपन्नावस्था नव्हे, पण ओढगस्त फार दूर नाही हे वर्तमानाचे सूचित नक्कीच. डॉलरपुढे दिवसेंदिवस ठुसका ठरत असलेला रुपया हेच सांगतो. दोन-अडीच महिन्यांत मोठ्या गतीने त्याने डॉलरमागे पंच्याऐंशीच्या भावनिक पातळीलाही भेदले. हे पाहता स्थिती आटोक्यात येण्यापलीकडे गेली इतके निश्चितच. तरीही चलाखपणात हार मानायची नाही असे काहींनी ठरविलेच आहे. त्यांचे म्हणणे रुपया पडतो असे नव्हे तर जगाच्या आर्थिक व्यवस्थेचे चलन असलेला डॉलर पुष्ट बनत चालल्याचा हा परिणाम आहे. शिवाय रुपया घसरला तर घसरला, त्यायोगे जगाच्या बाजारात आपल्या मालाला मोठी किंमत मिळविता येते. म्हणजेच निर्यातीतून आपले उत्पन्न वाढते. हे काही कमी नाही, असे राज्यशकट चालवणाऱ्यांनाही वाटते. त्यांचे हे वाटणे अपरिपक्व असल्याचे 'लोकसत्ता'ने याआधीही म्हटलेच आहे. आता तर त्यावर देशाचा दुसरा धोरण-ध्रुव असलेल्या रिझर्व्ह बँकेनेही शिक्कामोर्तब केले आहे. रिझर्व्ह बँकेकडून प्रसृत ताजी आकडेवारी आणि तिची उकल या संदर्भात क्रमप्राप्त ठरते. रिझर्व्ह बँक म्हणते की, रुपयाचे हलकेपण हे डॉलरच्या बदल्यात सुरू आहेच. पण त्यापेक्षा भीषण गोष्ट अशी की, भारताकडून व्यापार सुरू असलेल्या जगातील अन्य राष्ट्रांच्या चलनांच्या तुलनेत रुपयाचे मूल्यवर्धन सुरू आहे. एकुणात रुपयाची पटलावरील सार्वकालिक उतरंड आपल्या डोळ्यादेखत सुरू आहेच. हे अधिक भीतीदायी म्हणावे की डॉलरव्यतिरिक्त अन्य चलनांच्या तुलनेत त्याची सशक्तता भयंकर मानावी, हे पाहावे लागेल. ते नेमके सांगणारा निर्देशांक म्हणजे रुपयाचा 'वास्तविक प्रभावी विनिमय दर'. हा दर अर्थात 'रिअल इफेक्टिव्ह एक्स्चेंज रेट (रीअर)' हा द्विपक्षीय व्यापारात कोणाचे पारडे जड हे मापणारा एक सर्वमान्य निर्देशांक आहे. सर्वमान्य म्हणजे जगभरात मान्यता पावलेला असल्याने त्याला नाकारण्याची आपल्या धोरणकर्त्यांनाही संधी नाही, हे मुद्दाम स्पष्ट केले पाहिजे. हा निर्देशांक गेल्या वर्षी एप्रिलमध्ये शंभराखाली- म्हणजे ९९.०३ अंशावर होता. तेथून तो यंदाच्या नोव्हेंबरअखेर १०८.१४ अंशांचा उच्चांक गाठेपर्यंत चढला आहे. सरलेल्या ऑक्टोबरमधील १०७.२० या पातळीवरून अवघ्या महिनाभरात जवळपास एका अंशाची त्यात भर पडली आहे. या निर्देशांकाचा पारा खाली उतरतो तेव्हा भारताच्या निर्यातीला अधिक बरकत येते. परंतु सध्यासारखा पारा चढत जाणे हे भारताच्या द्विपक्षीय निर्यात व्यापाराला मारक ठरते. हे असे का घडते, ते उलगडून पाहूच. त्याआधी रुपयाचे पडणे निर्यातीसाठी फायदेशीर म्हणणाऱ्यांचे बुद्धिवैभव अगाधच आहे, हे कळू द्यावे. रुपयाचे हे एकीकडे झडणे आणि दुसरीकडे बळावणे असे विचित्र विचलन सध्या सुरू आहे. अमेरिकी चलन म्हणजेच डॉलरचे सबंध जगभरच्या चलनांबाबत बिघडलेले वर्तन हेच यामागील पक्के कारण, हे खरे. तेथे राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनाने डॉलरचे भलतेच फावले आहे. या सामर्थ्यातून त्या चलनाची ही उद्दाम दांडगाई सुरू आहे हेही खरेच. ट्रम्प आणि त्यांच्या संभाव्य धोरण धुडगुसाची अवघ्या जगाने धास्ती घेतली आहे. ट्रम्प यांनी जाहीरपणे म्हटल्याप्रमाणे अमेरिकेत दाखल होणाऱ्या आयात मालावरील सीमाशुल्क सरसकट वाढविल्यास केवळ चीनलाच नव्हे तर कुणासही ते जाचकच ठरेल. तसे झाले तर अमेरिकेतील आताशी काबूत येत असल्याचे दिसलेल्या चलनवाढीलाही ते फुंकर घालणारे ठरेल. हे लक्षात घेऊनच तेथील मध्यवर्ती बँकेने 'फेड'ने सुरू केलेले व्याजदर कपातीचे चक्र यापुढे थांबेल असे म्हटले नसले, तरी त्याची गती कमी होईल असे संकेत दिले आहेत. अर्थात कदम आस्ते आस्ते करत थांबणार. हे ताडूनच अमेरिकी रोख्यांच्या परतावा दराने मोठी उचल खाल्ली आहे. गुंतवणूकदारांना मायदेशात चांगला लाभ मिळत असेल तर भारतासारख्या उभरत्या राष्ट्रात तो गुंतवण्याची जोखीम ते घेणारच नाहीत. म्हणूनच परकीय गुंतवणूकदार संस्थांच्या गुंतलेल्या पैशाचे पाय भारतासह, अनेक उभरत्या बाजारपेठांतून वेगाने माघारी फिरत आहेत. भारताबाहेर तो पैसा डॉलररूपाने जात असल्याने, त्यांच्यासाठी डॉलर पुरवता पुरवता रुपयाची पुरेवाट सुरू आहे. हे असे चक्र सुरू असताना, रुपयाचे पडणे हे डॉलरने अन्य चलनांच्या तुलनेत कमावलेल्या सशक्ततेच्या मात्रेइतके नाही, असे ताजा 'रीअर निर्देशांका'चा पारा सुचवतो. दांडग्या डॉलरपुढे जगातील अन्य चलनांइतका रुपया शरण गेलेला नाही, असा याचा दुसऱ्या शब्दांत अर्थ सांगता येईल. प्राप्त स्थितीत ही फुशारकीची गोष्ट खचितच नाही. उलट अनेक नवे पेचप्रसंग यातून पुढे उभे राहतील. दीर्घावधीत रुपयाचे मूल्य सर्व चलनांच्या बाबतीत ढेपाळलेच आहे, हेही दुर्लक्षिता येणार नाही. सन २०२२ च्या सुरुवातीपासून डॉलरच्या तुलनेत रुपया ७४.३० वरून ८५.२० असा गडगडला आहे. म्हणजेच प्रत्येक डॉलर मूल्याच्या आयातीसाठी भारतीय आयातदाराला आता ८५.२० रुपये मोजावे लागतील. हेच प्रमाण या काळात युरोबाबत ८४.०४ वरून ८८.५६ पर्यंत, तर ब्रिटिश पौंडाबाबत १००.३० वरून १०६.७९ पर्यंत वाढले आहे. डॉलरबाबतीत दिसलेले अवमूल्यन हे पौंड, युरोच्या तुलनेत कमी आहे, ही समाधानाची गोष्ट नाही हेच ताजे आकडे सांगतात. याचा पहिला वाईट परिणाम गेल्या महिन्यातील भारताच्या आयात-निर्यातीच्या आकड्यांतून दिसून येतो. आयात-निर्यात या दोहोंतील तफावत अर्थात व्यापार तूट फुगून नोव्हेंबरमध्ये ३,७४८ कोटी डॉलरवर जाणे हे अधिकच गंभीर. ही तूट वाढली कारण त्या महिन्यात निर्यात घटली, तर आयात प्रचंड वाढली. यातील केवळ सोन्याची आयात ही महिनाभरात दुपटीने वाढून विक्रमी १,४८० कोटी डॉलरवर गेली. वजनाने महिन्याला सरासरी ६८ टनांच्या घरात असलेली सोने आयात नोव्हेंबरमध्ये थेट २०० टनांपुढे गेली. हाच सध्याच्या क्षणाला सर्वात मोठा धोका आहे. रुपयाचा वास्तविक प्रभावी विनिमय दर चढत गेला तर निर्यात महाग होऊन तिला पाचर बसेल. त्याउलट आयात स्वस्त बनेल. ज्यायोगे सोन्यासारख्या खरे तर उपद्रवी चीजवस्तूंची मागणी बोकाळत जाईल. रुपयाचे मूल्यच नव्हे, तर व्यापारतोलात बिघाडासाठी हा मोठा हातभारच. धष्टपुष्ट डॉलर हे तर एक जागतिक संकटच, त्याला आपण तरी काय करणार? हीच यावर प्रतिक्रिया आणि हताश निष्क्रियता हेच उत्तर असावे काय? सरकार, रिझर्व्ह बँकेला करता येण्यासारखा उपाय काहीच नाही काय? भारतातील उत्पादकतेला चालना मिळेल, ते जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक ठरेल, हे शासनकर्त्यांच्या हाती निश्चितच आहे. त्यासाठी उत्पादकांना कच्चा माल स्वस्तात मिळेल, देशाच्या कृषी क्षेत्राची उत्पादकता प्रभावी ठरेल हे पाहायला हवे. याला बाह्य जगाची आडकाठी असण्याचे कारणच नाही. भलते स्वप्नरंजन टाळून, धरातलावरील बदलांवर लक्ष देणे अधिक सयुक्तिक ठरेल. त्याउलट देशाच्या माजी अर्थसल्लागारांसह, अनेक अर्थविश्लेषक वेगळे पर्याय सुचवीतही आहेत. रिझर्व्ह बँकेकडे रग्गड विदेशी चलन गंगागळी आहे, एरवी रुपयाची बळकटीसुद्धा जर डोकेदुखीच ठरत असेल तर तो पडलेलाच बेहत्तर, असे काहींचे म्हणणे आहे. अलीकडे रुपया ज्या वेगाने आपटला, ते या सूचक निष्क्रियतेचा प्रत्यय देणारे आहे. तसे झाले तर पोरक्या रुपयाला कोणीच वाली उरणार नाही. धोरणकर्त्यांनाही मग लेकुरवाळे होऊन, आपला तो बबड्या रुपया, दुसऱ्याचा ते कारटा डॉलर असे उमाळे काढण्यावाचून गत्यंतर नसेल.

# बीड हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करा

## देवेंद्र फडणवीसांचे सीआयडी महासंचालकांना आदेश

मुंबई, (वृत्तसेवा) :- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आता पोलिस आणि सीआयडीकडून तपासाची सूत्रे वेगाने फिरवली जात आहे. देशमुख हत्येच्या निषेधार्थ बीडमध्ये मूक मोर्चा काढण्यात आला. आता या प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. बीड प्रकरणात जे आरोपी फरार आहेत. त्यांची संपत्ती जप्त करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चे अतिरिक्त महासंचालक बुरडे यांना दिले आहेत. बीड हत्या प्रकरणात २० दिवस उलटले आहेत. हत्या प्रकरणातील सातपैकी चार आरोपींना अटक करण्यात आली असून तीन आरोपी अद्याप आरोपी आहे. या फरार आरोपींना लवकरात लवकर अटक करा. तसेच धनजंय मुंडे यांना हाकला आणि वाल्मिकी कराडला अटक करा अशी मागणी सर्वपक्षीय नेत्यांनी केली आहे. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीसांनी मोठा निर्णय घेतला आहे. बीड प्रकरणात जे आरोपी फरार आहेत, त्यांची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा, असे आदेश चे अतिरिक्त महासंचालक बुरडे यांना देण्यात आले आहे. त्याबरोबरच बंदुकी सोबत ज्यांचे-ज्यांचे फोटो आहेत, ते जर खरे असतील तर त्या सर्वांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा,असे आदेश बीड पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहे आणि तातडीने फेरआढावा घ्या, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.



## स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रत्येक आरोपीला फाशीच व्हावी ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम भूमिका-धनंजय मुंडे

मुंबई (दि. २८) - बीड जिल्ह्यातील मस्साजोग ङ्गयेथील तरुण सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना कडक शासन व्हावे, त्यांना फाशीची शिक्षा व्हावी अशी माझी पहिल्या दिवशीपासून ठाम भूमिका होती आणि आजही तीच कायम आहे. या प्रकरणी आरोपींना कोणाच्याही कितीही जवळचा असला तरी तातडीने शासन व्हावे यासाठी आणि न्यायालयीन दिरंगाई होऊ नये म्हणून फास्टट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालावे यासाठी बारा डिसेंबरला सर्वात आधी मुख्यमंत्र्यांकडे लेखी मागणी मी केलेली आहे, असे मत अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा ही सर्वांचीच भूमिका आहे. मात्र या घटनेच्या आडून जे राजकारण केले जात आहे, ते दुर्दैवी आहे, तसे हे राजकारण करू नये असे कळकळीचे आवाहनही



धनंजय मुंडे यांनी केले आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येची घडलेली घटना निर्घृण आणि तितकीच चीड आणणारी होती. यासारख्या घटना जिल्ह्यातच काय तर महाराष्ट्रात कुठेही होऊ नयेत यासाठी अशा गुन्हेगारी प्रवृत्ती ठेचून काढणे आवश्यक आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी योग्य ती पाऊले उचलली असल्याचे ते म्हणाले.

## सोशल मिडीयावरुन दहशत निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्यास अथवा फॉरवर्ड केल्यास होणार कठोर कारवाई

### पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडून आवाहन



बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्हा पोलीस अधिक्षक श्री नवनीत काँवत यांनी जिल्हयातील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, कोणीही मोबाईल व इंटरनेटचा वापर करुन आपल्याकडे असलेले वैध अथवा अवैध शस्त्राचे (फोटो व्हीडीओ) सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित करु नये. तसेच एखाद्या मारामारीच्या घटनेतील रेकॉर्ड केलेला फोटो/व्हीडीओ, शिव्या देतांनाचा व्हिडीओ अथवा समाजात दहशत किंवा भिती निर्माण होईल अशी कोणतीही पोस्ट कोणत्याही सोशल मिडीया अकाउंटवरुन शेअर करु नये, अथवा फॉरवर्ड करु नये. तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित केल्या असतील/शेअर केल्या असतील किंवा फॉरवर्ड केल्या असतील त्या त्यांनी तात्काळ सोशल मिडीयावरुन डिलिट कराव्यात. समाज माध्यमांवर (सोशल मिडीया) अशा प्रकारे कोणीही शस्त्राचे, मारामारीचे अथवा शिवीगाळ केल्याचे किवा ज्यामुळे समाजात भिती व दहशत निर्माण होईल असे फोटो व्हीडीओ प्रदर्शित करील, लाईक करील किंवा फॉरवर्ड करील तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी सोशल मिडीयावरुन अशा पोस्ट केल्या आहेत. परंतू आम्ही दिलेल्या सुचनेनंतरही त्या पोस्ट डिलिट केल्या नाहीत. तर अशा व्यक्तींविरुध्द तात्काळ भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच इतर कायद्यान्वये योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## स्व.संतोष देशमुख यांच्या मृत्यूच्या आडून जितेंद्र आव्हाड यांचे गलिच्छ राजकारण उघड

### हवे तेवढे पैसे देतो, दलित, मुस्लिम सर्व लोक गोळा करा, मुंडे कसा मंत्री राहतो तेच पाहतो-जितेंद्र आव्हाड यांचे व्हाट्सअप चॅट लीक

मुंबई, (वृत्तसेवा): - स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संबंध महाराष्ट्र ढवळून निघालेला असताना या मृत्यूच्या घटनेच्या आडून आमदार जितेंद्र आव्हाड हे मात्र गलिच्छ राजकारण करत असल्याचे आता उघड झाले आहे. ङ्गङ्गआज बीडला येण्यापूर्वी जितेंद्र आव्हाड यांनी बीड येथील शरद पवार गटाच्या एका कार्यकर्त्याला व्हाट्सअप वरून मेसेज करून अतिशय गलिच्छ राजकारण साधायचा प्रयत्न केला असून त्यांचे हे चाट समाज माध्यमांवर लीक झाले आहेत. ''सर्व मसाला तयार करून ठेव मुंडे विरोधात आणि वाल्मीक विरोधात जे जे असेल ते सर्व गोळा कर हवे तेवढे पैसे मी देतो, मोर्चामध्ये मुस्लिम आणि



दलितांना गोळा कर त्यासाठी हवे तेवढे पैसे मी देतो, आंबेडकरी चळवळीतील दीपक केदार हा माझा माणूस आहे, त्यालाही मोर्चाच्या वेळी भाषणाची संधी द्या, मुंडे ला घोडे लावण्यासाठी काय काय बोलायचे हे मी त्याला सांगितले आहे. हा मुंडे आता कसा मंत्री राहतो आणि याला अजित पक्षात कसा ठेवतो तेच मी बघतो'' अशा स्वरूपाचे चॅट जितेंद्र आव्हाड यांच्या मोबाईल नंबर वरून आल्याचे या स्क्रीन शॉट मध्ये स्पष्ट दिसत आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या नेत्या ऍड. रूपालीताई ठोंबरे पाटील यांनी या चॅटचे स्क्रीन शॉट आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केले असून जितेंद्र आव्हाड यांना हे गलिच्छ राजकारण करण्यामागचा उद्देश विचारला आहे. तर दुसरीकडे समाज माध्यमांवरती हे व्हाट्सअप चॅट वाऱ्यासारखे व्हायरल झाले असून असल्या गलिच्छ राजकारणाच्या माध्यमातून काय साध्य करायचे आहे असा प्रश्न नेटकरी आता जितेंद्र आव्हाड यांना विचारत आहेत.




## पान १ वरून

### वाल्यांना थांबवण्याची...

पूर्वी वाल्याचा वाल्मिकी झाला, पण आता वाल्मीकचा वाल्या झाला आहे. या वाल्याने अनेक लोकांवर खोटे गुन्हे दाखल केले आहेत. पालकमंत्री व पोलिसांनी मिळून बीड जिल्ह्याचा सत्यानाश केला आहे, असेही आव्हाड यावेळी म्हणाले.

### शस्त्र परवाने...

त्यांना जी हुजूर करणारी माणसे हवी आहेत. पण आम्ही जी हुजूर करणारे नव्हे तर स्वाभीमानी माणसे आहोत. आम्ही भलेही राजकारणात बाजूला पडू. पण तुमच्यापुढे जी हुजूर करणार नाही, असेही सुरेश धस यावेळी म्हणाले.

### बीडचे पालकमंत्री...

आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात हे काय झाले? असा प्रश्न मला पडला. संभाजीराजे म्हणाले, मी संतोष देशमुख यांच्या घरच्या लोकांना भेटलो. त्यांच्याशी चर्चा केली. तेव्हा एकच निर्णय घेतला. तो निर्णय हा होता. हा या प्रकरणाचा जो महोरक्या आहे. त्याचा नेता धनंजय मुंडे आहे. मी नाव घेऊन सांगतो, तो नेता धनंजय मुंडे आहे. या लोकांना आश्रय देणाऱ्यांना धनंजय मुंडे यांना मंत्रिपद देऊ नका, असे मी त्यावेळी सांगितले होते. परंतु त्यांना मंत्रिपद दिले. आता त्यांचा राजीनामा घेतील की नाही, हकालपट्टी

## पान १ वरून

करतील की नाही हे मला माहीत नाही. परंतु धनंजय मुंडे यांना पालकमंत्रीपद देऊ नका. त्यांना बीडचे पालकमंत्री पद दिले तर बीडचे पालकत्व मी घेणार असल्याचे संभाजीराजे यांनी म्हटले. संभाजीराजे पुढे म्हणाले, आम्हाला दहशत चालत नाही. कुणी दहशत करत असेल तर मी या ठिकाणी येणार आहे. काय चालले या बीडमध्ये? बीडचा बिहार करायचा का? त्यामुळे आपल्याला रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नाही. हा महाराष्ट्र आपला आहे.

### धनंजय मुंडे यांचा...

करू शकत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणाच्या निष्पक्षसाठी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा. ही माझी नव्हे तर बीडमधील सर्वसामान्य माणसांची मागणी आहे, असे आमदार प्रकाश सोळंके यांनी म्हटले आहे.

### सर्वांनी एक होत...

देशमुख यांनी म्हटले आहे. तर संतोष देशमुख यांच्या कन्या वैभवी यांनी सर्वांनी एक होत माझ्या बाबांना न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची मुले व पत्नी, मुलांसह बंधू धनंजय देशमुख हे देखील या मोर्चात सहभागी झाले आहेत. हा मोर्चा कोणाच्याच नेतृत्त्वात काढण्यात येत नसल्याचे या वेळी सांगण्यात आले.

## वाल्मिक कराडविरोधात फडणवीसांचा विश्वासू आमदार मैदानात; सरकारला इशारा देत म्हणाले...

बीड, (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येमागे वाल्मिक कराड हा मुख्य सुत्रधार आहे. पोलीस या प्रकरणात दिशाभूल करत आहेत. अशी मागणी परळी, बीडसह संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहे. अनेक आमदारांनी व इतर लोकप्रतिनिधिंनी ही मागणी लावून धरली आहे. अशातच आज बीडमध्ये सर्वपक्षीय नेत्यांनी मूक मोर्चा काढला. त्यानंतर काही प्रमुख नेत्यांनी जनतेशी संवाद साधला. यावेळी लातूरमधील औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, ''मी येथे संतोष देशमुख यांना लातूरच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आलो आहे. तसेच मला बीडमधील जनतेला सांगायचं आहे



की लातूरमधील सर्व जनता आणि मी तुमच्याबरोबर आहे. संतोष देशमुख यांच्यासाठी आम्ही विधानसभेत आवाज उठवला आहे. विधान भवनाबाहेर देखील आम्ही आमचा आवाज बुलंद केला आहे. आता आम्ही रस्त्यावर देखील उतरलो आहोत. तुम्ही काहीही काळजी करू नका. आम्ही तुमच्याबरोबर आहोत''. आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, ''ज्या पद्धतीने त्या लोकांनी संतोष देशमुख यांना मारलं, महाराष्ट्राच्या इतिहासात इतकी क्रूरता आजपर्यंत कधीच ऐकायला, वाचायला मिळाली नव्हती. या प्रकरणातील आरोपींना फासावर लटकवल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. हे सांगायलाच मी इथे आलो आहे. येथे जो आक्रोश आपण पाहत आहोत तो फक्त बीडचा नाही, तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या जनतेचा आहे. मी सरकारमध्ये असलो तरी सरकारला सांगू इच्छितो की या प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर अटक झाली नाही तर हा आक्रोश बीडपुरता मर्यादित राहणार नाही, लातूर, धाराशिव, जालन्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# ५ जानेवारी ला होणारी एमपीएससी ची परीक्षा २ फेब्रुवारी २०२५ ला होणार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने दिनांक ०५/०१/२०२५ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ होणार होती मात्र शासनाद्वारे शुध्दी पत्रक काढून ही परीक्षा दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर केलेले आहे. परीक्षेसाठी समन्वय अधिकारी, पर्यवेक्षक, समवेक्षक, लिपोक, शिपाई यांचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि, शुद्धिपत्रकानुसार दिनांक ०५/०१/२०२५ रोजी घेण्यात येणारी महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ या परीक्षेच्या दिनांकात बदल करून सदरील परीक्षा ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात येईल. त्यानुषंगाने सदरील परीक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, आदेशान्वये सदरील परीक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या नेमणुका पुढील नियोजित दिनांकास होणाऱ्या महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ या परीक्षेसाठी कायम ठेवण्यात येत आहेत.

# अरूणा दगडूसाहेब चव्हाण (सूर्यवंशी) यांचे निधन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातल इंग्रजी विषयाच्या सहशिक्षीका अरूणा दगडूसाहेब चव्हाण (सूर्यवंशी) यांचे शनिवारी दुपारी अडीच वाजता अंबाजोगाई येथील संत भगवान बाबा चौक भागातील छत्रपती संभाजीनगर येथील राहत्या घरी शनिवारी दुपारी अडीच वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५६ वर्षाचे होते. मागील दहा वर्षापासून त्या केज तालुक्यातील युसुफवडगाव येथील माध्यमिक उच्च माध्यमीक विद्यालयात इंग्रजीच्या सहशिक्षक म्हणून कार्यरत होत्या.त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, असा परिवार आहे.माजी प्राचार्य व बीड जिल्ह्याचे राष्ट्रीय खेळाडू दगडूसाहेब चव्हाण यांच्या त्या पत्नी होतं.आज रविवारी सकाळी नऊ वाजता अंबाजोगाई शहरातील बोरूळ तलाव येथे त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# बालझुंबड-२०२५ या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावेः राजकिशोर मोदी

## रौप्य महोत्सवी वर्षा निमित्ताने बालझुंबड - २०२५ मध्ये अनेक वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग पंचवीसाव्या बालझुंबडचे आयोजन करण्यात आले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शाळा व शालेय विद्यार्थ्यांसाठी दिनांक ३ जाने ते ८ जाने २०२५ या दरम्यान बालझुंबडचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना चालना मिळते. तेव्हा अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी , सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी व संचालक संकेत मोदी यांनी केले आहे .

मागील २४ वर्षापासून प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने बालझुंबड हा उपक्रम अंबाजोगाई शहरात अखंडीतपणे राबविण्यात येत आहे. यंदाचे वर्ष हे बालझुंबड या उपक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. प्रतिवर्षी तालुक्यातील सर्व शाळां या उपक्रम ात उत्स्फूर्त असा प्रतिसाद देत असतात. याही वर्षी तालुक्यातील सर्व शाळा यामध्ये सहभागी होतील अशी अपेक्षा राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली आहे. बालझुंबड हा उपक्रम तालुकास्तरावर आयोजीत केला जात असल्यामुळे त्यासाठी आवश्यक ते नियोजन देखील त्याचप्रमाणे मंडळाच्या वतीने करण्यात येत असते. या उपक्रमातुन अंबाजोगाई तालुक्यातील विविध शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना यातून संधी प्राप्त होत आहे. क्रीडा मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते विद्यार्थ्यांच्या स्वागताच्या तयारीत असून हा उपक्रम अतिशय शिस्तबध्द व नियोजन बद्ध पार पाडण्यासाठी सज्ज झाले आहेत. रौप्यमहोत्सवी वर्षामुळे यंदा स्पर्धेचे वैशिष्टयपुर्ण नियोजन करुन तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यासाठी संयोजक प्रयत्नशील आहेत.

बालझुंबड-२०२५ या उपक्रमांतर्गत इ.१ ली ते ४ थी गटासाठी रंगभरण स्पर्धा, वैयक्तीक नृत्य, समुह नृत्य, इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी पी.पी.टी. स्पर्धा (PPT Competation), प्रश्नमंजुषा स्पर्धा (Quiz Competation), चित्रकला, वैयक्तीक नृत्य, समुहनृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देण्यासाठी बालझुंबड हे खुले व्यासपीठ आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जवळपास ७० ते ८० शाळेतील विद्यार्थी आपल्या शाळांच्या माध्यमातून सहभागी होतात. बालझुंबडच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक गुणी कलावंत तयार झाले असून ते नाटक, सिनेमा तसेच क्रीडाविश्वाच्या माध्यमातून विविध खेळाडू व कलांच्याद्वारे आपल्या छाप अवघ्या महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभर पाडत आहेत. तालुक्यातील अनेक शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन होत नाही अशा शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड ही केवळ एक स्पर्धा नसून एक पर्वणीच ठरल्या जात आहे. स्पर्धेच्या अधिक माहिती व प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी पालकांनी व शिक्षकांनी समन्वयक, बालझुंबड- २०२५, जोधाप्रसादजी माध्यमिक विद्यालय गुरुवारपेठ, अंबाजोगाई येथे संपर्क साधावा व अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी, संचालक संकेत मोदी तसेच समन्वयक राजेश कांबळे, मुख्याध्यापक आनंद टाकळकर , विनायक मुंजे संपर्क क्र.९८६०३३७००८/ ९८५०५९१०६१ /९४२१३४१६८८) यांनी केले आहे. बालझुंबड-२०२५ हा कार्यक्रम न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, विलासराव देशमुख सभागृह तसेच मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

# धारूर शहरातील सीटीव्ही कॅमेरे तात्काळ सुरू करा मागणी

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**



धारूर शहरात सुरक्षीतते साठी बसवलेले सीटीव्ही कॅमेरेहे अनेक दिवसा पासुन बंद आहेत ते तात्काळ सुरू करावेत आशी मागणी नगरपरीषद व पोलीस स्टेशनला निवेदना द्वारे युवक ककार्यकर्त्यानी केली आहे

ऐतिहासिक किल्ले धारूर शहरातील सार्वजनिक ठिकाणचे छ. शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छ.संभाजी महाराज चौक या व इतर सार्वजनिक ठिकाणी नगरपरिषद अंतर्गत काही दिवसापूर्वी नगरपरिषदने सीटीव्ही कॅमेरे लावले होते तर ते सध्या बंद आहेत सध्या काही चोरीच्या घटना, बे शिस्त वाहनाची ट्राफिक, मुलींची छेडछाड , व आशा अनेक घटना वारंवार दिवसें दिवस वाढ होत असल्याने व त्यावर आळा घालण्यासाठी तात्काळ बंद असलेले कॅमेरे चालू करण्यासाठी नगरपरिषदेस व पोलीस प्रशासनास निवेदन देऊन तात्काळ कॅमेरे चालू करा अशी मागणी प्रशासनास केली, यावेळी सामाजिक कार्यकर्ते आक्षय अंधारे, पत्रकार रोहित फावडे, माऊली औताडे, अनिल धाकतोडे, अक्षय डोंगरे आदीनी केली आहे

# घरात झोपलेल्या पती-पत्नीला जीवंत जाळण्याचा प्रयत्न, घराच्या दारावर पेट्रोल ओतून लावली आग

**मुंबई । प्रतिनिधी**

भिवंडी शहरात एक धक्कादायक घटना घडली. घरात झोपलेल्या पती-पत्नीला जीवंत जाळण्याचा प्रयत्न झाला आहे. निजामपुर पोलिस ठाणे हद्दीत कुरेशीनगर भागात ही घटना घडली आहे. घरात पती पत्नी झोपले असताना त्या घराला आग लावून जळून मारण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामध्ये पती-पत्नी जखमी झाले आहेत. पतीचे नाव आसिफ कुरेशी तर पत्नीचे नाव फरिन असे आहे.

मध्यरात्री अक्षात व्यक्ती घराच्या दारावर पेट्रोल ओतून लावली आग- दरम्यान, मि ळालेल्या माहितीनुसार, फरिन आसिफ कुरेशी व पती आसिफ कुरैशी असे दोघे झोपले होते. मध्यरात्री सुमारे ३ ते ३.३० वाजताच्या दरम्यान अज्ञात व्यक्ती घराच्या दरवाज्यावर पेट्रोल टाकून आग लावून फरार झाले. यावेळी हल्लेखोराने घराच्या मागील दरवाजाला बाहेरुन कडी लावली होती. आगीने पेट घेत घरात धूर जमा झाल्याने लागल्याने झोपेत असलेले दोघेही पती-पत्नी जागे झाले. त्यांनी लगेच आरडा ओरड केली. शेजारी जागे होऊन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ही आग विझविली.

# वडगाव शाळेत अवतरले बाल वैज्ञानिक; दप्तर मुक्त शनिवार निमित्त बनविल्या ब्रेन कॅप







**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट शाळा,वडगाव या शाळेतील शिक्षक सुभाष राठोड यांनी अगस्त्या फाऊंडेशनने घेतलेल्या विज्ञान विषयाच्या प्रशिक्षणानंतर आज शाळेत, दप्तरमुक्त शनिवार साठी ब्रेन कॅप बनविण्याचा उपक्रम घेतला.यावेळी मुलांनी व सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवत सहभाग नोंदवला ४ थी ते ८ वी च्या मुलांनी कृतीयुक्त पद्धतीने तयार केलेल्या ब्रेन कॅप आज गावातील लोकांसाठी वेगळेच आकर्षण होते.सर्व मुले व शिक्षक डोक्यावर कॅप घेऊन शाळेतून निघाले,या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

**● राठोड सर हे नेहमीच काहीतरी छान उपक्रम शोधून काढत असतात, त्यामुळे शाळेचे शैक्षणीक आकर्षण कायम राहते. -सौ. करुणा रविंद्र ठोंबरे, अध्यक्ष शा.व्य.स.वडगाव.**

**● सिप्ला व अगस्त्या फाऊंडेशन कडून याबाबत प्रशिक्षण मिळाले,त्याचा मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी फायदा होत आहे, छोटे छोटे प्रयोग मुले आनंदाने करत आहेत.मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. - सुभाष राठोड,मुख्याध्यापक शाळा वडगाव.**

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 26/12/2024

अर्जदार : श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) ल. क्र. 737/2024, 1) छत्रे अन्ना आश्रोबा 2) शिंदे शरद पंडितराव 3) भोयटे सतिष हरिदास रा. सेलु पो. जातेगांव ता. गेवराई जि. बीड

2) ल. क्र. 738/2024 1) गाडे बाबासाहेब काशिनाथ 2) पेजगुडे विश्वनाथ एकनाथ दोघे रा. सुर्डी पो. रामपुरी ता. गेवराई जि. बीड 3) बनगर लक्ष्मण साहेबराव रा. चोपड्याची वाडी पो. रामपुरी ता. गेवराई जि. बीड

3) ल. क्र. 740/2024 1) चव्हाण पांडुरंग रघुनाथ रा. सेलु पो. जातेगांव ता. गेवराई जि. बीड 2) राठोड गोरख मोतीराम 3) राठोड बाबु रामधन दोघे रा. जांभाजी तांड, जातेगाव ता. गेवराई जि. बीड

4)क्र.742/2024 1) दाभाडे दगडू नामदेवराव 2) हजारे रामदास गणपती 3) दोरतले रामभाऊ अप्पाराव रा.चोपड्याची पो. रामपुरी ता. गेवराई

5) ल. क्र. 743/2024 1) आबुज वचिष्ट रामकिसन रा. सिंदफना चिंचोली, नाथापुर ता. जि. बीड 2) नाईकनवरे किसन मदनराव 3) डरपे गोरख सखाराव दोघे रा. खेर्डा बु. पो. भेंडटाकळी ता. गेवराई जि. बीड

6) ल. क्र. 744/2024 1) शिंदे बाजीराव भागवत रा. तपे निमगाव पो. रामपुरी ता. गेवराई जि. बीड 2) रामा पांडुरंग धोत्रे रा. टाकरवन ता. गेवराई जि. बीड 3) परमेश्वर उद्धवराव तौर रा. शेलगाव थडी पो. टाकरवन ता. गेवराई जि. बीड

7)ल. क्र. 745/2024 1) गाडे शरद बाबासाहेब 2) गाडे गंगाधर काशिनाथ 3) साळुंके मुंजाभाऊ धोंडीराम रा. सुर्डी बु. पो. रामपुरी ता. गेवराई

8) ल. क्र. 748/2024 1) राठोड गोरख मोतीराम रा. जांभळी तांडा पो. जातेगाव ता. गेवराई जि. बीड 2) चव्हाण पांडुरंग रघुनाथ रा. सेलु पो. जातेगाव ता. गेवराई जि. बीड 3) बाबु रामधन राठोड रा. जांभळी तांडा पो. जातेगाव ता. गेवराई जि. बीड

9) ल. क्र. 749/2024 1) कुरेशी सद्दाम जिलानी 2) कुरेशी जिलानी जैनुद्दीन 3) मोमीन युसूफ कुरेशी 4) भागवत त्रिंबक सातपुते तिघे. रा. टाकरवन ता. माजलगाव जि. बीड

10) ल. क्र. 751/2024 1) सोळंके मुंजाभाऊ धोंडीराम 2) सोळंके धोंडीराम नामदेव 3) तात्याबा बाबासाहेब गाडे तिघे रा. सुर्डी बु. पो. रामपुरी ता. गेवराई जि. बीड 4) गिताराम बप्पासाहेब तौर रा. बाबुलतारा पो. रामपुरी ता. गेवराई जि. बीड

11) ल. क्र. 752/2024 1) गोरख सखाराम डरपे 2) किसन मदनराव नाईकवाडे दोघे रा. खेर्डा बु. पो. भेंडटाकळी ता. गेवराई जि. बीड 3) आबुज वशिष्ट रामकिसन रा. सिंदफना चिंचोली पो. नाथापुर ता. जि. बीड

12) ल. क्र. 753/2024 1) राठोड राजेंद्र मिठू रा. राजुरी मळा पो. तलवडा ता. गेवराई जि. बीड 2) पाराप्पा नामदेव व्होनकडे रा. शिवाई नगर, कोल्हेर रोड, गेवराई ता. गेवराई जि. बीड 3) संजयकुमार बाबुराव डोरले रा. शिवाजी नगर, शिरूर कासार ता. शिरूर कासार जि. बीड

13)ल. क्र. 754/2024 1) पवार महेश बालासाहेब 2) पवार महादेव अशोकराव 3) पवार प्रकाश भगवानराव रा. रामपुर ता. गेवराई जि. बीड

14)ल. क्र. 755/2024 1)व्होनकडे पाराप्पा नामदेव 2)संगिता पाराप्पा व्होनकडे दोघे रा. शिवाई नगर, कोल्हेर रोड, गेवराई ता. गेवराई 3) डोरले संजयकुमार बाबुराव रा. शिवाजी नगर, शिरूर कासार ता.शिरूर कासार जि. बीड 4)राठोड राजेंद्र मिठू रा. तलवडा ता. गेवराई जि. बीड

15) ल. क्र. 756/2024 1) दत्ता बाबुराव धुमाळ रा. पानशेंद्रा ता. जि. जालना 2) ढगे अंकुश भगवानराव रा. हनुमान मंदिराच्या बाजुला, सिरसवाडी, जालना ता. जि. जालना 3) ज्योती हरिश पांडे रा. जुना मोंढा, बक्कलगुड, जालना ता. जि. जालना

16) ल. क्र. 757/2024 1) पठाण वसीम खलंदरखान रा. युसूफ कॉलनी, जालना ता. जि. जालना 2) अयुब खान अख्तर खान रा. मनियार गल्ली, जुना जालना ता. जि. जालना 3) गुलाम मुस्तफा गुलाम रसुल खान रा. मुढेगाव पो. हिंसवन खु. ता. घनसांगवी जि. जालना

17)ल. क्र. 758/2024 1) अन्सर खान नवाब खान पठान रा. राजाबाग, सवारदर्गा, औरंगाबाद रोड, जुना जालना ता. जि. जालना 2) आवेज खान अय्युब खान रा. शेर सवार नगर, जालना ता. जि. जालना 3) अय्युब खान अख्तर खान रा. मनियार गल्ली, जुना जालना ता. जि. जालना

18) ल. क्र. 759/2024 1) भालेराव लिना अभिजीत 2) भालेराव अभिजीत अनिल दोघे रा. कचेरी रोड, अक्षय प्लाझा, जालना ता. जि. जालना 3) कुलकर्णी दिलीपराव प्रभाकर रा. सहकार बँक कॉलनी, जालना ता. जि. जालना

19) ल. क्र. 760/2024 1) भालेराव अभिजीत अनिल 2) भालेराव लिना अभिजीत दोघे रा. कचेरी रोड, अक्षय प्लाझा, जालना ता. जि. जालना 3) कुलकर्णी दिलीपराव प्रभाकर रा. सहकार बँक कॉलनी, जालना ता. जि. जालना

20) ल. क्र. 762/2024 1) जाधव योगीराज किसन रा. वडगाव वाखरी ता. जि. जालना 2) भिसे राजेश उद्धवराव रा. तांदुळवाडी पो. हिंसवन ता. जि. जालना 3) चव्हाण नारायण सखाराम रा. मंगरूळ ता. घनसांगवी जि. जालना

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 08/01/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. अक्षय सं.जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २८१/२०२४**

**ॲड. क्षीरसागर एस.पी. यांच्या मार्फत**

**किशोर नरहरराव कुलकणी व इतर वि. निरंक**

अर्जदार : १. किशोर पि. नरहरराव उर्फ नरहरी कुलकर्णी (कडेपुरकर), वय ५६ वर्षे, धंदा - गुत्तेदारी, रा.नांदेवाली, ता. शिरुर कासार, जि. बीड, २. निर्मलाबाई भ्र. नरहरराव उर्फ नरहरी कुलकर्णी (कडेपुरकर) वय ८० वर्षे, धंदा शेती, रा. सदर,

**अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत.**

ज्यापोक्षा नरहरी काशिनाथ कुलकर्णी हे राहते घरी नांदेवली, ता. शिरुर कसार, जि. बीड येथे दिनांक २१/०५/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. हे की, त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २२/११/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०१/२०२५ ही आहे.**

**आदेशावरून.**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.**

## जाहीर प्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पाटोदा यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३७४/२०२४**

**ॲड.आय.बी.नागरे यांच्या मार्फत**

**कृष्णकुमार वि. निरंक**

ज्यापेक्षा **१. बाबुराव पि. पंढरीनाथ जायभाये, व २. जनाबाई भ्र. बाबुराव जायभाये** रा. मौजे काकडहिरा, ता. पाटोदा जि.बीड हे दिनांक **१. १२/०९/२०१५ व २. २९/०४/२०२४** रोजी मयत झालेले असून खालील अर्जदार त्यांचे वारस आहेत.

१) कृष्णकुमार पि. बाबुराव जायभाये, पत्ता - काकडहिरा, ता. पाटोदा, जि. बीड, २) कविता भ्र. अशोक बांगर, सुलतानपुर, ता. गेवराई, जि. बीड, ३) अनिता भ्र. ज्ञानेश्वर चेपटे, घुगेवाडी, ता. शिरुर कासार, जि. बीड ४) सुनिता भ्र. बाबासाहेब नागरे, संगमजळगांव, ता. गेवराई, जि. बीड

मयत हे अर्जदार क. १ ते ४ यांचे आईवडील होते. या व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास सम जाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक

महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत १. बाबुराव पि. पंढरीनाथ जायभाये, व २. जनाबाई भ्र. बाबुराव जायभाये, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पु. ता. २३/०१/२०२५.**

**आदेशावरून.**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, पाटोदा**

# आ. सुरेश धस यांनी परळी बाजार समितीच्या बाबतीत केलेले सर्व आरोप खोटे व बिनबुडाचे : सभापती मुंडे

## राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी बाजार समितीच्या उपबाजार पेठेचे लोकार्पण केलेले, सुरेश धसांनी भानावर येऊन बोलावे : सूर्यभान मुंडेंचा इशारा

**परळी । प्रतिनिधी**

परळी बाजार समितीच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांची तसेच बाजार समितीची खोटी बदनामी आमदार सुरेश धस करत असून सिरसाळा येथे उभारण्यात आलेले स्व.पंडित अण्णा मुंडे व्यापारी संकुल हे पूर्णतः शासकीय नियमांचे पालन करून व बाजार समितीच्या मालकी हक्काच्या जागेतच केलेले आहे. त्यामुळे सुरेश धस यांनी यासंदर्भात केलेले सर्व आरोप बिनबुडाचे व खोटे असून केवळ बदनामी करण्यासाठी केले आहेत, असे प्रत्युत्तर परळी बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी दिले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ चे उपबाजार पेठ सिरसाळा येथे सर्वे नंबर ३४३ मध्ये २० एकर जमीन ही बाजार समितीच्या मालकीची आहे, या मालकीच्या जागेवर भव्य असे ९३ गाळ्यांचे कै. पंडितअण्णा मुंडे व्यापारी संकुल सर्व रीतसर परवानगी घेऊन बांधण्यात आलेले आहे व याचे दिनांक ५/१२/२०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलेले आहे. त्यामुळे आमदार सुरेश धस यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत दिलेली सर्व माहिती खोटी व बिनबुडाची आहे अशी माहिती सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी दिली. तसेच ऐकीव माहितीच्या आधारे बिनबुडाचे आरोप त्यांनी न करता भानावर यावे, असेही सूर्यभान मुंडे यांनी म्हटले आहे.

जिल्हाधिकारी बीड यांचे दिनांक ०२/०९/१९८५ च्या आदेशानुसार उपबाजार पेठ सिरसाळा येथील २० एकर जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांना रीतसर हस्तांतरित केलेली होती, नवीन परळी तालुका झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेनुसार सिरसाळा परिसरातील ३२ गावे कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ यास जोडणे संबंधीची दिनांक २८ जुलै १९९८ ची अधिसूचना प्रसिद्ध करून ही गावे परळी बाजार समितीत जोडण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव च्या मालकीचे मालमत्ता हस्तांतरित करायच्या दृष्टीने परळी बाजार समितीस सर्वे नंबर ३४३ मधील माजलगाव बाजार समितीच्या मालकीची २० एकर म्हणजे सुमारे आठ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली, त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी क्रमांक २००७/मशाला-२/जमा-१/२९ दिनांक ०५/०५/२००७ अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या ताब्यात असलेली उपबाजार पेठ सिरसाळा येथील सर्वे नंबर ३४३ मधील आठ हेक्टर जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ ला आदेश क्रमांक ७६/आरबी-२/एलएनडी/३०१/१-२८/८० दिनांक०२/०९/ १९८५ मधील सर्व अटीस अधीन राहून हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली होती. ही सर्व कागदपत्रे अमच्यासह शासन दरबारी उपलब्ध आहेत. त्यानुसार या मंजूर आदेशाप्रमाणे माननीय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी सदरील उपबाजार पेठ करिता या मालमत्तेचे मूल्यांकन रुपये १२३१६२२/- एवढी रक्कम बाजार समिती माजलगाव ला अदा करण्यात यावी त्यानुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री नियमन अधिनियम १९६३ चे कलम ४४ अन्वये परळी बाजार समिती ही जमीन हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली होती.

यामुळे आमदार सुरेश धस यांच्याकडून हे व्यापारी संकुल बाजार समितीच्या जागेवर बांधण्यात आलेले नाही हे म्हणणे खोटे आहे. तसेच या व्यापारी संकुलाचे उद्घाटन झाले नाही हेही म्हणणे चुकीचे व खोटे आहे. आमदार सुरेश धस यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत करण्यात आलेले सर्व आरोप खोटे व बिनबुडाचे असून हे आरोप अन्न व नागरी पुरवठा मंत्री माननीय नामदार धनंजय मुंडे साहेब तसेच सर्व संचालक मंडळ व बाजार समितीची बदनामी करण्यासाठीच केलेले आहेत असे यावरून दिसते असे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी यावेळी सांगितले.

**मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते एखाद्या प्रकल्पाचे जेव्हा उद्घाटन / भूमिपूजन होत असते तेव्हा त्याबद्दलची संपूर्ण माहिती तपासली जाते. त्यानंतरच मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री कार्यालय त्या उद्घाटन भूमिपूजनाला परवानगी देतात कोणत्याही वादग्रस्त ठिकाणी उद्घाटन भूमिपूजन या प्रमुख मंडळींच्या हस्ते होत नाही याचेही भान या आमदाराला नसावे याचा खेद व्यक्त केला आहे.**

### थोडी तरी लाज बाळगा

**स्वर्गीय पंडितअण्णा मुंडे यांनी सुरेश धस यांना १९९८ मध्ये जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष केले, स्वतः अध्यक्ष असताना सर्व अधिकार उपाध्यक्षांना दिले. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत आष्टीची जागा शिवसेनेकडून भांडून घेऊन भाजपासाठी सोडली आणि त्या ठिकाणी सुरेश धस यांना उमेदवारी देऊन निवडून आणले. पंडितअण्णा हे सुरेश धस यांच्यावर मुलासारखे प्रेम करायचे, त्याच अण्णांच्या नावाने वाढलेल्या मार्केट कमिटीच्या व्यापारी संकुलावर राजकीय द्वेष पोटी आरोप करताना भान आणि लाज बाळगावी असा सल्लाही सूर्यभान मुंडे यांनी धस यांना दिला आहे.**

## बीड शहरात पिण्याच्या पाण्याचा काळा बाजार! अंधारे ताईचे दुर्लक्ष: शेख युनुस



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर आहे, नळाला दहा ते बारा दिवसाला पाणी येत आहे तरीसुद्धा जुनी ईदगाह जवळील शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाण्याच्या टाकीतून दिवसातून हजारो लिटर पाण्याची बेकायदेशीरपणे खाजगी टँकरद्वारे विक्री केली जात आहे . त्याचा कोणत्याही प्रकारचा लेखाजोखा अथवा हिशोब ठेवल्या जात नाही. हे टँकर कोणाला विकले जातात? किती रुपयाला विकले जातात? आणि तो पैसा कुठे जातो. याचा कोणताही प्रकारचा हिशोब ठेवला जात नाही अशाप्रकारे पाण्याचा काळाबाजार कोणाचा आशीर्वादाने केला जात आहे याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. माझी लोकप्रतिनिधी तसेच जिल्हा अधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी याकडे लक्ष द्यावे व योग्य ती कारवाई करावी.

## सुरेश धस सारख्या नीच प्रवृत्तींना स्वबळावर प्रसिद्धीला आलेल्या महिला कलाकार चालत नाहीत का ?

## अभिनेत्री प्राजक्ता माळी चा परखड सवाल

### तुमच्या राजकारणासाठी कष्टाने नाव कमावलेल्या महिलांची इमेज का डागाळता: प्राजक्ता माळींचा उद्विग्न सवाल



**प्राजक्ता माळी यांची सुरेश धस यांच्या विरोधात राज्य महिला आयोगाकडे तयार तक्रार, प्राजक्ता माळींची माफी मागणार नाही सुरेश धस मग्रुरीवर ठाम**

**कला क्षेत्रातील महिलांना असे टार्गेट केले जाऊ नये यासाठी मुख्यमंत्र्यांनी ठोस कारवाई करावी, प्राजक्ता माळींची विनंती**

**मुंबई । प्रतिनिधी**

एका सांस्कृतिक कार्यक्रमात एका मंत्र्यासोबत सत्काराचा एक फोटो घेऊन मागील दीड महिन्यापासून माझी बदनामी केली जात असून अत्यंत हतबल होऊन एक गरीब कुटुंबातून प्रसिद्धीच्या झोतात आलेली महिला म्हणून मी मागच्या दीड महिन्यापासून ते सहन करत आहे, मात्र आमदार सुरेश धस यांनी कालपासून अत्यंत कुत्सित भावनेने माझे नाव परळीच्या नेत्यांशी जोडून राज्यभरात बदनाम केले आहे. याचा मी तीव्र शब्दात निषेध करते. सुरेश धस सारख्या नीच प्रवृत्तींना स्वबळावर प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या महिला कलाकार चालत नाहीत का? तुमच्या राजकीय स्वार्थासाठी आमच्यासारख्या महिलांना का बदनाम करता? असा परखड सवाल आज अभिनेत्री प्राजक्ता माळी ने पत्रकार परिषदेत उपस्थित केला आहे. सुरेश धस यांनी माझ्यासह काही महिला कलाकारांचे नाव घेऊन जे कुत्सित बुद्धीचे व नीच वक्तव्य केले, त्यावेळी बोलतानाचा त्यांचा हावभाव, त्यांची नक्कल करण्याची पद्धत आणि हशा पिकवण्याचा उद्देश, हा अत्यंत क्लेशदायक व बदनामीकारक होता. अनेक वर्ष कष्ट घेऊन आम्ही इंडस्ट्रीमध्ये नाव कमावले आहे. तुमच्या स्वार्थी राजकारणासाठी कष्टाने नाव कमावलेल्या सावित्रीच्या लेकींची महिलांची इमेज डागाळणे योग्य आहे का, असा उद्विग्न सवाल प्राजक्ता माळी यांनी उपस्थित केला आहे.

## शांताई अर्बन कडून इंडियन मेडिकल असोसिएशन (आय एम ए ) यांचा सत्कार




**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या इंडियन मेडिकल असोसिएशनचे कार्यकारणी यामध्ये अध्यक्षस्थानी सन्माननीय डॉक्टर अनंत मुळे सर यांना अध्यक्ष पद भेटले व उपाध्यक्ष माननीय डॉक्टर संतोष शिंदे सर तसेच सचिव डॉक्टर अमोल गित्ते सर अशी कार्यकारणी जाहीर केल्यानंतर शांताई अर्बनने यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या हातून चांगले कार्य घडो व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले डॉ. देशपांडे सर ,डॉ जयदत्त घोळवे सर डॉ.निलेश घोळवे तसेच शांताई अर्बनचे संचालक मंडळ श्री.संदीप वाघमारे, डॉ.ज्ञानेश्वर शिंदे,परमेश्वर शिंदे,शाहु बोराडे,मंगेश सुतूळे तसेच शांताई अर्बनचे कर्मचारी उपस्थित होते.

## ऊस तोडणी कामगारांच्या विमा पॉलिसीचा प्रश्न येत्या आठवड्यात सोडवा... अन्यथा कोयता बंद आंदोलन : आ.सुरेश धस

### मुख्यमंत्रीना भेटून आगामी अधिवेशनामध्ये हा कायदा करण्यात यावा मागणी करणार

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यामध्ये गळीत हंगाम सुरू झालेला असून अद्यापही ऊस तोडणी कामगारांच्या अपघाती विम्याचा प्रश्न सोडविण्यात आलेला नाही ऊस तोडणी कामगारांच्या जीविताचा हा प्रश्न असल्यामुळे येत्या आठ दिवसात ऊस तोडणी कामगारांची विमा पॉलिसी करण्यात यावी अन्यथा महाराष्ट्र राज्यातील सर्व कारखान्यावरील ऊस तोडणी कामगार कोयताबंद आंदोलन करतील असा इशारा लोकनेते गोपीनाथ रावजी ऊस तोडणी कामगार वाहतूकदार मुकादम संघटनेचे प्रदेश संघटक आ. सुरेश धस यांनी दिला आहे.

आष्टी येथे आयोजित लोकनेते गोपीनाथरावजी ऊस तोडणी कामगार, वाहतूकदार, मुकादम संघटनेच्या संवाद बैठकी मध्ये ते प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव सानप, बाबुराव केदार, सुरेश तात्या वनवे, शिवाजी पवार, तात्याराम हुले उपस्थित होते



पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील ऊस तोडणी कामगार संपूर्ण महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राच्या बाहेर देखील ऊस तोडणी साठी स्थलांतरित होत असतात ऊस तोडणी चे काम हे अत्यंत जिकरीचे असून अत्यंत कष्टप्रद असलेला हा व्यवसाय असून ऊस तोडणी कामगारांचे प्रचंड हाल ऊस तोडणी करताना होत असतात त्यांच्या शारीरिक कष्टाबरोबरच त्यांच्या अनेक सामाजिक समस्या देखील आहेत ऊस तोडणी करताना रात्री अपरात्री उसाच्या फडात ऊस तोडणी करावी लागते.

## दत्तधाम मधील श्रीदत्त मूर्तीची हजारो भाविकांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील फुलाईनगर भागात गुरुवार दि २६ रोजी श्री.दत्त मुर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत करण्यात आली, यावेळी भाविक दत्तभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दत्तधाम परिसरातील मंदिराचे बांधकाम भाविकांनी स्वयंप्रेरणेने हाती घेतले होते यात मंदिर आणि मुख्य गाभाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, त्याआधी दि २५ रोजी श्रीदत्त मूर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेत परिसरातील सारे परिवार सहभागी झाले होते. दि २६ रोजी विधिवत प्राणप्रतिष्ठा हजारो भाविकांच्या उपस्थितीत आणि सद्गुरू साडेगावकर महाराज यांच्या हस्ते करण्यात आली,तसेच दि २७ रोजी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता तिन्ही दिवशी भाविकांनी मोठया प्रमाणावर उपस्थिती लावली होती.

बीड शहरातील फुलाई नगर गुरुप्रसाद कॉलनी एकता नगर व्यंकटेश कॉलनी येथील भाविक भक्तांच्या सहकार्याने भव्य आणि दिव्य श्रीदत्त मंदिराचे काम सुरू असून सध्या गाभाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे अत्यंत सुंदर आणि मनमोहक अशी दत्तमूर्ती देखील आणण्यात आली, दिनांक २५ रोजी दुपारी चार वाजता भगवान दत्तात्रयाच्या मूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली,आणि दिनांक २६ गुरुवार रोजी सकाळी आठ वाजता यजमान पत्रकार प्रशांत सुलाखे,उद्योजक अतुल संघांनी,शामसेठ क्षीरसागर,संतोष कुलकर्णी, योगेश खडके यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला, या सोहळ्यासाठी श्रीसमर्थ संस्थान साडे भोगलगाव येथील सद्गुरू सुरेश महाराज रामदासी यांची प्रमुख उपस्थिती होती, सायंकाळी चार वाजता प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता तर रात्री ८ ते १० या वेळेत नादब्रह्मच्या स्थानिक कलाकारांचा गुरुवार पंचपदी आणि भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला,दिनांक २७ रोजी याच भागात असलेल्या संदीप कुलकर्णी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते,या तीनही दिवसात दत्त भक्तांनी मोठी गर्दी केली होती. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे पौरोहित्य संतोष रत्नपारखी, जीवन पाठक, संतोष कुरलेकर, अनिकेत दाणी, सिद्धेश जोशी, आणि केशव पाठक यांनी केले, यावेळी विधिवत कार्यक्रमात प्रायश्चित्त संकल्प, प्रधान संकल्प,गणपती पूजन, मातृका पूजन, नांदीश्राद्ध, देवता स्थापन, अग्निस्थापन, मूर्ती जलाधिवास, नवग्रह हवण, स्नपण, तत्वन्यास, शय्याधिवास, मूर्तीप्राणप्रतिष्ठा, बलिदान पूजन करण्यात आले यावेळी हजारो भाविक उपस्थित होते,परिसरात एकमेव दत्तमंदिर झाल्याने दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढू लागली आहे.




## महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर बीड जिल्ह्यातील बियाणे उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधावर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीज हा महाराष्ट्र शासनाचा शासन अंगीकृत बियाणे क्षेत्रातील अग्रगण्य उपक्रम असून, महाबीज गत ४८ वर्षापासून महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांचे हित जोपासत भारतीय बियाणे कायद्याच्या सर्व निकषांचे पालन करून ना नफा ना तोटा तत्त्वावर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे प्रमाणीत बियाणे (डबल लेबल) पुरवठा करत आलेले आहे व करत आहे. याच बियाणे महामंडळास



नव्यानेच लाभलेले व्यवस्थापकीय संचालक, श्री योगेशजी कुंभेजकर (भा. प्र. से.) यांनी आज दिनांक २६ डिसेंबर रोजी, बीड तालुक्यातील चौसाळा, हिंगणी या गावातील बियाणे उत्पादक शेतकऱ्यांच्या, तूर - वाण गोदावरी, हरभरा, ज्वारी, गहु, व महाबीज राजमा या पिकांच्या उत्पादन क्षेत्रावर भेटी देऊन बियाणे उत्पादक प्रगतशील शेतकरी ल यांच्याशी संवाद साधत बियाणे उत्पादनातील आव्हाने यासह आदी बाबी जाणून घेतल्या.

महाबीज जैविक बुरशी नाशक, ट्रायकोडर्माच्या वापराने जमिनीतून येणाऱ्या बुरशीजन्य रोगापासून मुक्ती मिळाल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

यावेळी त्यांच्या समवेत सदर प्रक्षेत्र भेटीस, महाबीजचे विभागीय व्यवस्थापक जगदीश खोकड, जिल्हा व्यवस्थापक अजय फुलझेले, उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे, तालुका बी. कें. प्रभारी परेश शिंदे, कृषी क्षेत्र (विपणन) अधिकारी सचिन धस, कृषी क्षेत्र (उत्पादन) अधिकारी अविनाश केदार, कृषी पर्यवेक्षक अर्जुन चव्हाण, सौरभ निनाळे आदींसह चौसाळा व हिंगणी येथील शेतकरी उपस्थित होते.